# बियांच्या डिझाइनची कानपट्टी

- VINKAM-GYAN ची रचना



चित्रात दाखवलेली कानपट्टी विणण्याची संपूर्ण रचना खालील प्रमाणे:

**साहित्य**: कुठलीही लोकर घ्या, पण ती मऊ आणि उबदार असावी. 50 ग्रॅम लोकरीचे 25 -25 ग्रॅमचे दोन गुंडे बनवून घ्या. दोन्ही गुंड्यांमधून लोकर एकत्र करून आपण ही कानपट्टि विणणार आहोत. विणताना योग्य सुया निवडणे फार महत्वाचे असते. ज्या सुया वापरून वीण खूप घट्ट अथवा अतिशय सैल येणार नाही त्या मापाची सुई ही विणण्यास योग्य असते.

चित्रात दाखविलेल्या कानपट्टी साठी मी वापरलेले साहित्य असे - वर्स्टेड वेट लोकर (डबल निट लोकरीपेक्षा थोडी जाड असते.) ६.५ mm च्या सुया

**रचने मध्ये वापरलेल्या टाक्यांविषयी विशेष नोंद** :

**बियांची रचना** : या रचनेसाठी सरळ टाका , उलटा विणायचा आणि उलटा टाका हा सरळ विणायचा असतो.

आजच्या रचने मध्ये जी संक्षिप्त अक्षरे आपण वापरणार आहोत ती मी इथे नमूद केली आहेत.

- स : सरल टाका
- उ : उलट टाका
- वप : लोकर सुईवरून पलीकडे घ्यावी.
- सरए : पुढचे दोन टाके एकत्र सरळ विणायचे.
- सपुमा : टाका सरळ विणायचा, आणि तोच टाका सुई मागे घेऊन मागच्या बाजूने अजून एकदा सरळ विणावा.
- त१ : दोन टक्क्यांच्या मध्ये असलेल्या लोकरीला डाव्या सुईवर घेऊन त्याला सरल विणायचे. एक नवीन टाका तयार होतो.
- निनिस : पुढचे दोन टाके डाव्या सुईवरून सरळ टाका विणतो त्याप्रमाणे, पण न विणताच उजव्या सुईवर घ्यायचे आहेत. डाव्या सुईचे टोक या दोन टाक्यांच्या मधून पुढे घ्यायचे आहे आणि मागून ते दोन टाक्यांचा एक टाका करायचा.

लोकरीचे २ पेड एकत्र घ्या.

लोकरीच्या शेपटीकडच्या लांब टोकाने सुईवर 9 टाके घ्या. हीच पहिली ओळ आहे.

ओळ २ (स ओळ): उ१ स१ उ१ स१ उ१ स१ उ१ स१ उ१ (९ टाके)

ओळ ३ (उ ओळ): ओळ २ प्रमाणेच विणावे.

काजे १:

ओळ ४ : उ१ स१ उ१  स१ वप स२ए उ१ स१ उ१

ओळ ५ ते  ९ :  ओळ २ प्रमाणे विणावे.

काजे २:

ओळ १० : उ१ स१ उ१  स१ वप स२ए उ१ स१ उ१

ओळ ११ ते १५  :  ओळ २ प्रमाणे विणावे.

**टाके वाढविणे:**

इथे दोन पद्धतीने टाके वाढवायचे आहेत. दोन्ही बाजूने ४ टक्यांची बियांची  वीण  शेवटापर्यंत कायम ठेवायची आहे. मधे एक टाका असल्यास (विषम टाके) त्याचा एकाचा दोन करायचा आणि मधे दोन टाके असल्यास (सम टाके) दोघांच्या मधून एक नवीन टाका निर्माण करायचा आहे.

| | | |
|---|---|---|
| ओळ १६ : उ१, स१, उ१, स१, | सपुमा, | स१, उ१, स१,उ१ (१० टाके) |
| ओळ १७ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१० टाके) |
| ओळ १८ : उ१, स१, उ१, स१, | स१, त१, स१, | स१, उ१, स१,उ१ (११ टाके) |
| ओळ १९ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (११ टाके) |
| ओळ २० : उ१, स१, उ१, स१ , | स१, सपुमा, स१, | स१, उ१, स१,उ१ (१२ टाके) |
| ओळ २१ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१२ टाके) |
| ओळ २२ : उ१, स१, उ१, स१, | स१, स१, त१, स१, स१, | स१, उ१, स१,उ१ (१३ टाके) |
| ओळ २३ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१३ टाके) |
| ओळ २४ : उ१, स१, उ१, स१ , | स१, स१, सपुमा, स१, स१ | स१, उ१, स१,उ१ (१४ टाके) |
| ओळ २५ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१४ टाके) |
| ओळ २६ : उ१, स१, उ१, स१, | स१, स१, स१, त१, स१, स१, स१ | स१, उ१, स१,उ१ (१५ टाके) |

ओळ १६ ते १९ प्रमाणे मधे टाके वाढवायचे. जितकी रुंदी हवी असेल तेवढे टाके वाढवून झाले की साधारण १४ ते १५ इंच लांबी पर्यंत हेडबॅंड विणावा.

**पूर्ण लांबीसाठी खाली दिलेल्या ओळी विणाव्यात :**

| | | |
|---|---|---|
| ओळ २७ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१५ टाके) |
| ओळ २८ : उ१, स१, उ१, स१, | स१, स१, स१, स१, स१, स१, स१, | स१, उ१, स१,उ१ (१५ टाके) |

ओळ २७ आणि  २८ पूर्ण लांबी मिळे पर्यंत विणाव्या.

**टाके कमी करणे :**

इथे दोन पद्धतीने टाके कमी करायचे आहेत. दोन्ही बाजूने ४ टक्यांची बियांची  वीण  शेवटापर्यंत कायम ठेवायची आहे. टाके वाढवताना ज्याप्रमाणे एकातून दुसरा टाका बाहेर पडतो आहे असे दिसते, तसेच टाके कमी करताना कमी केलेला टाका हा योग्य दिशेने कललेला दिसायला हवा. त्यासाठी आपण दोन वेगळया पद्धतीने टाके कमी करणार आहोत.

टाके कमी करायला देखील टाके वाढवायला जितक्या ओळी लागल्या तितक्याच ओळी लागणार आहेत. (ओळींचे क्रमांक नव्याने सुरू केले आहेत)

| | | |
|---|---|---|
| ओळ १ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१५ टाके) |

| | | |
|---|---|---|
| ओळ २ : उ१, स१, उ१, स१, | स१, स१, निनिस, स१, स१, स१, | स१, उ१, स१,उ१ (१४ टाके) |
| ओळ ३ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१४ टाके) |
| ओळ ४ : उ१, स१, उ१, स१, | स१, स१,स२ए , स१, स१, | स१, उ१, स१,उ१ (१३ टाके) |
| ओळ ५ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१३ टाके) |
| ओळ ६ : उ१, स१, उ१, स१, | स१,निनिस, स१, स१, | स१, उ१, स१,उ१ (१२ टाके) |
| ओळ ७ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, उ१ | स१, उ१, स१,उ१ (१२ टाके) |
| ओळ ८ : उ१, स१, उ१, स१, | स१, स२ए , स१, | स१, उ१, स१,उ१ (११ टाके) |
| ओळ ९ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (११ टाके) |
| ओळ १० : उ१, स१, उ१, स१, | निनिस, स१, | स१, उ१, स१,उ१ (१० टाके) |
| ओळ ११ : उ१, स१, उ१, स१, | उ१, उ१, उ१, | स१, उ१, स१,उ१ (१० टाके) |
| ओळ १२ : उ१, स१, उ१, स१, | स२ए | स१, उ१, स१,उ१ (९ टाके) |

**शेवटचा टप्पा : बटण इथे लावावे.**

ओळ १३ – २८ : उ१ स१ उ१ स१ उ१ स१ उ१ स१ उ१ (९ टाके)

एक उलट आणि एक सरळ टाका विणून टाके एकावरून दुसरा काढून घेत सर्व टाके बंद करावेत. अतिशय सैल हाताने टाके बंद करावेत.

अधिक माहितीसाठी HTTP://WWW.YOUTUBE.COM/C/VINKAMGYAN या लिंकवर क्लिक करा कि:वा LEARN.VINKAM@GMAIL.COM या ई-पत्त्यावर संपर्क करा.

*कॉपीराइट २०१८. सर्व हक्क विणकाम-GYAN कडे राखीव. नमुना केवळ वैयक्तिक, बिगर-व्यावसायिक वापरासाठी आहे. या नमुन्यापासून बनविलेले विक्री वस्तू प्रतिबंधित आहेत.*

*Copyright 2018. All Rights Reserved at Vinkam-GYAN. Pattern is for personal, non-commercial use only. Selling items made from this pattern is prohibited.*